MHRG120002622025

| | |
|---|---|
| खटला दाखल दिनांक | : २९-०७-२०२५ |
| खटला नोंदणी दिनांक | : २९-०७-२०२५ |
| निकाल दिनांक | : १०-०३-२०२६ |
| कालावधी | **: ०० वर्ष, ०७ महिने, १२ दिवस** |

**प्रथम वर्ग न्यायदंडाधीकारी न्यायालय, मुरूड, जि. रायगड–अलिबाग**
**(पीठासीन अधिकारी – घनःशाम रा. तिवारी)**

**संक्षीप्त फौजदारी खटला क्र. १८१/२०२५** **निशाणी क्र.१४**

| | |
|---|---|
| प्रथम खबरी अहवालाचा तपशील : अपराध क्रमांक : १०५/२०२५,<br>दिनांक २९–०३–२०२५<br>पोलीस स्टेशन : राज्य उत्पादन शुल्क भरारी पथक क्र.१ अलिबाग | |
| तक्रारकर्ता | महाराष्ट्र शासन मार्फत रा.उ.शु.भरारी पथक क्र.१ अलिबाग |
| महाराष्ट्र शासन/फिर्यादी तर्फे | श्री. सतिश नाईक,<br>सहाय्यक सरकारी अभियोक्ता. |
| आरोपी | रघुनाथ विठ्या वाघमारे<br>वय – ४७ वर्ष, धंदा – मोलमजुरी,<br>राहणार– महाळुंगे, ता. मुरुड, जि. रायगड–अलिबाग |
| आरोपीकरिता/ तर्फे सादरकर्ता | श्री. ए. ए. चोगले व एफ.एल. जामदार, विधीज्ञ |

**न्या य नि र्ण य**
(दिनाकः १०-०३-२०२६ रोजी अधिघोषीत)

आरोपीविरुद्ध प्रस्तुत खटला महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५(ई) अन्वये शिक्षेस पात्र अपराधासाठी चालविण्यात आला.

२. अभियोगपक्षाच्या कथनानूसार, तक्रारदार निमेश सानू नाईक (सा.क्र.१) यांना दि .२९.०३.२०२५ रोजी गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार ते स्वतः, इतर पोलीस कर्मचारी व दोन पंच असे खाजगी वाहनाने मौजे महाळुंगे, ता. मुरुड येथे रवाना झाले. तेथे त्यांनी छापा टाकला असता आरोपी स्वतःच्या राहत्या घराच्या मागील मोकळ्या जागेत प्लॅस्टीक कॅनमध्ये २० लिटर गावठी हातभट्टी दारु बेकायदेशीरपणे ताब्यात बाळगतांना मिळून

आला. पोलीसांनी सदर मुद्देमाल जप्त केला. तक्रारदार यांनी आरोपीविरुद्ध शासनाचे वतीने तक्रार नोंदविली.

३. सदर तक्रारीवरुन आरोपीविरुद्ध राज्य उत्पादन शुल्क भरारी पथक क्र.१ अलिबाग अंतर्गत गुन्हा नोंदवही क्र. १०५/२०२५ प्रमाणे महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९, कलम ६५ (ई) नूसार शिक्षेस पात्र गुन्हा नोंदविण्यात आला. तपासाअंती आरोपीविरुद्ध दोषारोप दाखल करण्यात आले..

४. आरोपीविरुद्ध (निशाणी क्र.०६ प्रमाणे) उपरोक्त नमूद गुन्हयाचा तपशील आरोपीला वाचून समजावून सांगीतला. आरोपीने सदरचा गुन्हा कबूल नसल्याचे सांगून संपरिक्षेची मागणी केली.

५. आरोपीचा भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ३५१ (१) (ब) नुसार निवेदन (नि. क्र.१३) नोंदविण्यात आला असता त्याने खोटा गुन्हा दाखल करण्यात आल्याचा बचाव घेतला.

६. खटल्यातील पुरावा व उभय पक्षांचा युक्तीवाद या सर्व बाबींचे अवलोकन करता न्यायीक निकालासाठी उद्भवलेले मुद्दे त्यावरील माझे निष्कर्ष व निष्कर्षामागील कारणे खालील प्रमाणे आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | अभियोगपक्ष हे सिध्द करतो काय की, आरोपीने घटनेच्या दिवशी विना परवाना बेकायदेशीर गावठी हातभट्टी दारू विक्री कामी ताब्यात बाळगून अपराध केला? | नाही. |
| २ | अंतिम आदेश काय? | आरोपी दोषमुक्त |

## निष्कर्षामागील कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ व २ बाबतः–**

७. आरोपीविरुद्ध गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने आरोपीच्या ताब्यातून घटनेच्या दिवशी दारु बंदी गुन्हयाचा माल जप्त केला व जप्त केलेला माल दारु बंदी गुन्हयाचा होता हे सिध्द करणे आवश्यक आहे.

८. तक्रारदार निमेश सानू नाईक (सा.क्र.१) व संतोष पांडूरंग पिसाळ (सा.क्र.२) यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दिनांक २९.०३.२०२५ रोजी गुप्त बातमीदारामार्फत

मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार ते स्वतः, इतर पोलीस कर्मचारी व दोन पंच असे खाजगी वाहनाने मौजे महाळुंगे, ता. मुरुड येथे रवाना झाले. तेथे त्यांनी आरोपीच्या घरी छापा टाकला असता तो स्वतःच्या राहत्या घराच्या मागील मोकळ्या जागेत प्लॅस्टीक कॅनमध्ये २० लिटर गावठी हातभट्टी दारु बेकायदेशीरपणे ताब्यात बाळगतांना मिळून आला. जप्त गावठी दारूमधून १८० मि.ली. नमूना पंचांसमक्ष रासायनिक परिक्षणासाठी दोन बाटल्यात वेगळा काढून त्यांना सिलबंद करण्यात आले, त्यावर पंचांच्या सहयांचे लेबल लावले. त्याबाबत सा.क्र.२ यांनी पंचांसमक्ष निशाणी ११ कडील घटनास्थळ पंचनामा केला. आरोपीला फौ.प्र.सं.कलम ४१अ नुसार नोटीस देण्यात आली. जप्त मुद्देमाल, नमूना बाटल्या घेवून पोलीस स्टेशनला आल्यावर तक्रारदारने आरोपीविरूध्द निशाणी ९ कडील तक्रार दाखल केली. साक्षीदार क्र. २ यांच्या साक्षनुसार श्री गावडे यांनी प्रस्तूत गून्हयातील जप्त मुद्देमाल मधील नमून्याची सिलबंद बाटली निशाणी ११ कडील प्रत्रासह कलिना येथे तपासणीसाठी पाठविली.

९. अभिलेखावर उपलब्ध पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसते की, तक्रारदार सा.क्र.१ व सा.क्र.२ यांनी अभियोगपक्षाच्या कथनानूसार पुरावा दिला असला तरी उलटतपासात त्यांनी कथन केले की, जेथे छापा टाकला त्या घराचा क्रमांक त्यांना सांगता आला नाही, ते ज्या खाजगी वाहनाने छापा टाकायला गेले त्याचा क्रमांक तक्रार व पंचनाम्यात नमूद नाही, बातमीची खात्री करण्यासाठी त्यांनी बनावट ग्राहक पाठविला नव्हता. अशा परिस्थीतीत केवळ सा.क्र.१ व २ यांच्या पुराव्याआधारे आरोपीविरूध्दचा गुन्हा सिध्द झाला असे मानता येणार नाही.

१०. प्रस्तुत प्रकरणात अभियोगपक्षाने जप्त मुद्देमालाचा रासायनिक तपासणी अहवाल सादर केलेला नाही. त्यामुळे कथित मुद्देमाल गावठी दारु असल्याचे सिध्द झालेले नाही. आरोपीविरूध्दचा गुन्हा सिध्द करण्यासाठी कोणताही स्वतंत्र साक्षीदार तपासण्यात आलेला नाही. त्यामुळे आरोपी बेकायदेशीरपणे दारु बंदी गुन्हयाचा माल बाळगुन विकत असल्याबाबत कोणताही विश्वासार्ह पुरावा अभिलेखावर आलेला नाही. करिता मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदविला आहे.

११. खटल्यामध्ये आरोपीविरुद्ध लावलेले दोषारोप सिध्द न झाल्याने आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र ठरतो. आरोपीचे ताब्यातुन जप्त करण्यात आलेला दारुबंदी गुन्हयाचा मुद्देमाल आव्हान कालावधी संपल्यानंतर मा. राज्य उत्पादन शुल्क विभाग यांचेकडे सुपूर्द करणे योग्य होईल. सबब मुद्दा क्र.२ च्या उत्तरार्थ मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

| | |
|---|---|
| १. | आरोपी **रघुनाथ विठ्या वाघमारे** ह्यास भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम २७८(१) अन्वये त्याच्यावर लावण्यात आलेल्या महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९, कलम ६५ (ई) अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या गुन्हयातून निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |
| २. | आरोपीचा जामीन कदबा व जातमुचलका रद्द करण्यात येतो. |
| ३. | आरोपीने भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ४८१ प्रमाणे रुपये १५,०००/– चा जामीन कदबा व जातमुचलका सादर करावा. |
| ४. | गुन्हयातील जप्त मुद्देमाल आव्हान कालावधी नंतर राज्य उत्पादन शुल्क विभाग यांचेकडे विल्हेवाटसाठी वर्ग करण्यात यावा. |
| | न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला. |

GHANSHAM RAMLAL TIWARI
Digitally signed by GHANSHAM RAMLAL TIWARI
Date: 2026.03.11 14:57:37 +0530

(घनःशाम रा. तिवारी)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,मुरुड

दिनांक :- १०-०३-२०२६.